The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# महानुभाव संप्रदाय आधुनिक विचारधारा

**प.पु.म.श्री देमेराजबाबा कपाटे**
संचालक :-श्री कृष्ण मंदिर महानुभाव आश्रम , परभणी

**प्रस्तावना** :-

महानुभाव पंथाचे मराठी भाषेसाठी असलेले योगदान सर्वश्रृत आहे. मराठी भाषेच्या सुरुवातीच्या काळात श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथ, काव्य व इतर वाङमय या भाषेत महानुभाव पंथीयांनी निर्माण करून मराठी भाषेला उच्च दर्जा प्राप्त करून दिला . सुमारे पाच हजार ग्रंथ मराठी भाषेत महानुभाव पंथी यांनी निर्माण केलेले आहेत. या ग्रंथ भांडारामुळे मराठी भाषा समृद्ध झाली आहे. "लीळाचरित्र "सारखा आद्यग्रंथ मराठी भाषेत निर्माण केला, तो महानुभाव पंथीय म्हाईंभट्ट यांनी तसेच पहिली मराठी स्त्री कवयित्री महादंबा ही महानुभाव पंथीय मराठी भाषेतील हे पहिली स्त्री काव्य महादंबेचे "धवळे" या नावाने सर्वांना परिचित आहे .

महानुभाव पंथाचे प्रवर्तक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांनी सामाजिक क्रांती घडवून पर्यावरण संरक्षणाचा मूलमंत्र समाजाला दिला . त्यामुळे श्री चक्रधर स्वामी पर्यावरणवादी विचारसरणीचे अग्रदूत ठरतात . भगवान श्री चक्रधर स्वामींचा अवतार शके ११४२ मध्ये झालेला असला तरी जीव ,देवता , प्रपंच आणि परमेश्वर या चार तत्वांचे प्रतिपादन करणारे विचार हे सृष्टीच्या मुळारंभापासूनच चालत आलेले आहे .

त्या अर्थाने महानुभाव पंथ हा सत्य सनातन पंथ आहे . जीवाने परमेश्वराच्या कृपेला पात्र होण्यासाठी त्याची भक्ती केली पाहिजे ही भक्ती अनन्य , निष्काम अशी असली तरच जीव परमेश्वराच्या कृपेला पात्र ठरू शकतो. असे ज्ञान देणारा सृष्टीच्या मूळ आरंभातला जो परमेश्वराचा अवतार त्याने सांगितलेले जे ईश्वरीय ज्ञान जे तत्वज्ञान ते महानुभाव तत्त्वज्ञान होय . याचा विचार केला असता महानुभाव पंथाचे विचारधाराही आद्य विचारधारा आहे हे स्पष्ट होते हे अमृतधारा आहे.

**पर्यावरण आद्य पुरस्कर्ते सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी :-**

पृथ्वी ही बहुरत्ना वसुंधरा आहे भरभरून देणारी आहे तिच्या गर्भात बहुरत्नांचा अनमोल ठेवा आहे . परंतु या सर्व गोष्टींचा नाश मनुष्य आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी करतो . परंतु माणसाने तिचे रक्षण करावे . स्वार्थी बुद्धीने माणूस पर्यावरणाचा नाश करून स्वतःवर संकट ओढून घेत आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे हे कर्तव्य आहे हे जाणले पाहिजे . मनुष्याने जर निसर्गनिर्मित गोष्टींचा नाश केला तर भविष्यकाळ मात्र वाईट असू शकतो याचे त्रिकालाबाधित सत्य स्वामींनी बाराव्या शतकात जाणले . आणि अखिल मानव जातीला सावध केले यावरून श्री चक्रधर स्वामी पर्यावरण रक्षक म्हणून भूमिका बजावताना दिसतात .

सद्यस्थितीत समाज विकासाच्या दृष्टीने विकसनशील कार्यक्रम राबवले जातात. खरे तर याचा प्रारंभ 12 व्या शतकात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी केला . अमेरिकेचे उपाध्यक्ष अलगोर यांनी ग्लोबल वार्मिंगमुळे होणाऱ्या संकटाची जाण अलीकडे करून दिली. पण पृथ्वीच्या या समस्येविषयी श्री

चक्रधरांनी मानवाला बाराव्या शतकातच सुचित केले. निसर्गामधून आपल्याला औषधी मिळतात. हिरडा-बेहाडा यासारख्या वनस्पती आजार बरा करतात .निसर्गात आयुर्वेदाचे औषधी भांडार आहे .वनात राहणारे तपस्वी निसर्गाशी समरस होऊन त्यांचे गुणधर्म जाणतात . असा मार्ग स्वामींनी सांगितला .

**स्वामींचे निरुपणातून विचार :-**

स्वामींनी आपले विचार मांडण्यासाठी धर्मधुरीनांनी मोठेपणाचे लक्षण म्हणून स्वीकारलेल्या संस्कृतचा अवलंब न करता जनसामान्यांची बोली भाषा असलेल्या मराठीचा अवलंब केला. आत्तापर्यंत सुस्पष्टपणे कोणीही प्रतिपादन न केलेले देवता तत्व स्वामींनी सांगितले. व्यवहारात ज्यांची अनेक नावांनी पूजा केली जाते. ज्यांचे उच्च कनिष्ठ असेच स्तरही मानले जातात. ज्यांची मंदिरे उभारले गेली आहेत. पुराणामधून ज्यांच्या कार्याचे ,चरित्राचे वर्णनही करण्यात आले आहे. अशा असंख्य देवतांना आत्तापर्यंतच्या तत्त्ववेत्यांनी विचारात घेतलेले नव्हते. अशा असंख्य देवतांची स्वामींनी " देवता " या तत्त्वाद्वारे सोय लावली.८१ कोटी सव्वा लक्ष १० त्यांचे नऊ थोवे (गट) प्रतिपादन केले . त्याचबरोबर देवतांच्या शक्तीच्या मर्यादा व त्यांच्या भक्तीच्या अंतवत् फळांचे लक्षणे सांगितले.

जीव हा परमेश्वरापासून पूर्णपणे भिन्न असून तो कधीही ब्रह्म होऊ शकत नाही. परमेश्वर हा भाज्य आहे. तर जीव हा भजक आहे. या परमेश्वराची निष्काम देणे अनन्य व्हावे भक्ती करून त्याची कृपा संपादन केली तरच जिवाचे अविद्येचे बंध नष्ट होऊन तो जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचा मुक्त होईल व परमेश्वराच्या केवल पदाचा आनंद अविनाशी पणे भोगीत राहील . तोच त्याचा मोक्ष असेल. असे विचार स्वामिनी आपल्या वेळोवेळी निरोपणातून भक्ती जणांना सांगितले आहे .त्या वेळेच्या विद्वानांना पंडितांना या तत्त्वज्ञानाने प्रभावित केले. स्वामींनी प्रतिपादन केलेले हे तत्त्वज्ञान बाह्य अंगाने नवीन वाटले तरी त्याचा धागा थेट विश्वाच्या प्रारंभापर्यंत जातो.

**श्री चक्रधरांचा स्त्री विषयक दृष्टिकोन :-**

श्री चक्रधर स्वामींच्या परिवारात स्त्रिया बऱ्याच होत्या. त्यात महादाईसा ,बाईसा ह्या प्रमुख होत्या. देमाईसा,एकाईसा,साधाईसा, आऊसा या सर्व स्त्रिया श्री चक्रधरांच्या शिष्या होत्या. स्वतंत्र असे अस्तित्व नव्हते तर श्री चक्रधरांनी त्यांना आधार दिला होता. श्री चक्रधरांचे स्त्री दातृत्व जसे यावरून स्पष्ट होते. निराधार जीवन जगणाऱ्या आणि कुटुंबातून दूर गेलेल्या स्त्रिया श्री चक्रधरांच्या महानुभाव पंथाच्या आश्रयाला आल्या होत्या.

समाजाने अव्हेरलेल्या स्त्रियांचे आश्रयस्थान म्हणजे श्री चक्रधरस्वामी होते. त्यांनी अशा दुःखहर्ता स्त्रियांना मायेचा आधार दिला व त्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी मार्गदर्शन करून त्यांच्या जीवनाचे सार्थक केले. बाराव्या शतकात स्त्रीला ऋतू प्राप्ती झाल्यानंतर तिचा विटाळ पाळला जात होता. त्यावेळेस स्त्रीला कोणत्याही पदार्थाला कोणत्याही वस्तूला स्पर्श करण्याची परवानगी दिली जात नव्हती. परंतु या प्रसंगाला स्वामींनी मात्र विरोध दर्शवला आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजाला पटवून दिला.

**प्राणीमात्रांविषयी दयाभाव :-** स्वामींना मानसिक हिंसाही आवडत नव्हती. त्यामुळे त्यांनी उल्लेख असा केला ."वर्म स्पर्शावरि शिरच्छेदू चांग " कृतीने वाणीने कोणालाही दुखवू नये असा त्यांचा कडक नियम

होता. सालबर्डीच्या वनामध्ये सशाला जीवनदान देणारी रक्षण ही लीळा ससा हा मुका व गरीब प्राणी तुम्ही त्याला का मारता ? म्हणून पारध्यांना शिकारीपासून प्रवृत्त करून सशाला अभय देतात. "महात्मे हो आता तुम्ही जा" म्हणून ससिक रक्षण करतात. या लिळेतून स्वामींचे प्राण्यांबद्दलचे प्रेम तसेच नम्रवृत्तिही दिसून येते.

जर परमेश्वर अवतार एका साधारण प्राण्याला **महात्मे हो** अशी हाक देत असेल तर तो मनुष्याप्रती किती महत्त्वपूर्ण आहे याचा अनुभव या लीळेतून व्यक्त होतो. महाराष्ट्र हा सात्विक म्हणून प्राणीमात्रास अभय देऊन पर्यावरण संरक्षण करणार आहे त्यामुळे येथे अहिंसा तत्वाचे पालन होणे आवश्यक आहे .मुंगी देखील आपल्या हातून मारली जाऊ नये असा भक्तजनास सल्ला स्वामींनी दिला .

**सामाजिक क्रांतीचे जनक :-**

स्वामींच्या आणि वार मराठी वाणीमुळे सामान्यांपासून विद्वानांपर्यंत ज्ञानी पंडित यांच्याकडे व जीवन मुक्तीच्या एकेश्वरी तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाले. त्यात षट्शास्त्रसंपन्न पंडित म्हईमभट्ट, आचार्य नागदेव, सारंगपंडित, नाथोबा, उमाईसा शांताबाईसा यासारख्या स्त्रिया सुद्धा होत्या." हा प्रतिती पंथू की देमती " हे स्वामींचे वचन आत्मप्रचिती , शास्त्रप्रचिती लाभलेल्यांना अभय वाटत होते. महाराष्ट्राचे यादव राजे सम्राट महादेवराय हे सुद्धा स्वामींकडे आकर्षित झाले होते. स्वामींचा परिवार सर्व जातीवर्णांच्या लोकांनी भरलेला होता. स्वामींचा निवास सार्वजनिक ठिकाणी मंदिरात , झाडातळी अथवा धर्म शाळेत असायचा.

स्वामींच्या वेळी महाराष्ट्रात विषमता कर्मकांड जातीभेद यांनी समाज जीवन पूर्णपणे ग्रासलेले होते. धर्माच्या नावाखाली यज्ञप्रधान हिंसा व सकाम देवता भक्ती यांनी सामान्य मनुष्य " **किंम् कर्तव्य मूढ**" झाला होता. वर्षाला दोन हजार वृत्तांचे प्रतिपादन करणारा हेमाद्रीचा चतुवर्गचिंतामणी हा धर्मग्रंथ ठरला. यावेळी स्वामींनी जनसामान्य जनांमध्ये जाऊन भेदभावाची बंधने दूर करून सर्वांना जवळ केले. "**तुमचा जिऊ यांच्या काई जीवलिया** " या शब्दांनी स्त्रियांना तुच्छ समजणाऱ्या विद्वानांचा पुरुषी अहंकार स्वामींनी संपवला. त्यांच्यात वैचारिक परिवर्तन केले. व्यवहारात आणि कथा भेदभाव ही धार्मिक वंचना थांबवली. म्हणून स्वामींना महाराष्ट्राचे सामाजिक क्रांतीचे जनक म्हटले तर वावगे ठरणार नाही .

**उपसंहार :-**

अशाप्रकारे या पंथाने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात अहिंसावादी सात्विक भक्तीचा प्रसार केला. महानुभाव पंथाने मराठी साहित्याला व मराठी मनाला पुष्ट करण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. "**लीळाचरित्र**" सारखा आद्यग्रंथ मराठीला देऊन मराठीचा गौरव वाढवण्याचे काम पंथाने केले आहे.

आज उपयुक्त ठरणारी आधुनिक विचारधारा स्वामींनी 12 व्या शतकात समाजासमोर ठेवून समाजाला जागृत करण्याचे काम केले. स्वामींनी आपल्या भक्तजणांना चौकस बुद्धीने विचार करण्याचा

सल्ला दिला. महानुभाव सांप्रदायाच्या तत्त्वज्ञानातून त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, धार्मिक, राजकीय तसेच समता, बंधुता, न्याय ही मूल्य दिसून येतात.

**निष्कर्ष :-**

१) श्री चक्रधरस्वामींचे विचार आधुनिक वादाला पूरक आहेत हे दिसून येते.

२) स्त्रियांची दखल घेणारा महानुभाव पंथ हा त्या काळातील एकमेव पंथ आहे हे स्पष्ट होते.

३) पर्यावरणासंदर्भातील संकटाची जाण करून देणारा लीळाचरित्र हा भविष्यात उपयोगी ग्रंथ हे स्पष्ट होते.

४) स्वामींचे कार्य महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे पुनर्निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहे.

५) स्त्रीदायत्व, स्त्री औदार्य ,आणि स्त्री समानता श्री चक्रधरांनी जाणीवपूर्वक पाळली आहे.

**संदर्भसूची :-**

१) महानुभाव दर्शन- वार्षिक अंक आवृत्ती सातवी २००८

२) दैवयोग गौरव ग्रंथ- श्री गोपीराज ग्रंथ संग्रहालय रिद्धपूर काशी, जि. अमरावती.